GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 7 | JANUARY – 2017

लातूर जिल्ह्यातील आंबेडकरी प्रेरणेचा नाटककार : डॉ.अनिल कांबळे

प्रा.डॉ.राजकुमार मस्के
विभागप्रमुख,पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग , महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर.

प्रस्तावना

लातूर जिल्हा हा परिवर्तनवादी चळवळींचा जिल्हा म्हणून सर्वदूर परिचित आहे. सामाजिक न्यायासाठी लढणा-या कार्यकर्त्यांचे विद्यापीठ म्हणजे लातूर व संपूर्ण जिल्हा. लातूर जिल्ह्यातील चळवळींचा तालुका म्हणून उदगीर तालुका महाराष्ट्रात ख्यातकीर्त आहे. शिक्षण, समाज, संस्कृती, कला, क्रीडा अशा विविध अंगाने कार्य करणा-या संस्थांचे ऊर्जाकेंद्र म्हणजे उदगीर. उदगीर इतिहासातही येथे झालेल्या लढाईमुळे प्रसिद्ध आहे. न्यायासाठी संघर्ष करणा-या संवेदनशील कार्यकर्त्यांची व प्रज्ञावंत साहित्यिकांची ही भूमी आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातलं सोन्याचं पान म्हणजे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय; या महाविद्यालयाने महाराष्ट्रात शिक्षणाच्या पॅटर्नला सुरूवात केली; मुहूर्तमेढ रोवली. जिद्दी कार्यकर्ते, जाज्वल्यनिष्ठा असलेले सृजनशील, विद्रोही लेखक, कवी, कादंबरीकार, नाटककार जाणिवपूर्वक घडविले. डॉ.अनिल कांबळे हा आंबेडकरी प्रेरणेचा नाटककार याच महाविद्यालयाचा, माझा एक गुणी विद्यार्थी. त्याच्या आंबेडकरी प्रेरणेच्या नाटकाचा विनम्र शोध खालीलप्रमाणे घेतला आहे.

दलित नाटकाची प्रेरणा

दलित नाटककार कोणत्या प्रेरणा घेवून लिहितो? तो कोणासाठी आणि कशासाठी लिहितो? या सर्व प्रश्नांची उत्तरे जेव्हा मी शोधतो, तेव्हा प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रेरणेतून दलित नाटकाची निर्मिती झाली आहे, हे सिद्ध होते. ''दलित नाटक हे प्रामुख्याने आंबेडकरी विचारांनी प्रभावित झालेल्या जीवनविषक आकलनाचा आविष्कार आहे. या नाटकाची प्रेरणाच मुळी बाबासाहेब आंबेडकर आहेत, हे स्पष्ट आहे... या सर्व कलाविष्काराच्या पायाशी भगवान बुद्धानी सांगितलेली मानवांबद्दलची अतीव करूणा आहे.''[१] डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्धाच्या प्रेरणेतून दलित नाटकाचा जन्म झाला आहे. डॉ.अनिल कांबळे यांचे 'डागणी' चे मनोगत वाचत असताना हे प्रत्ययास येते की, 'डागणी' ह्या नाट्यकृतीची निर्मिती आंबेडकरी विचारातून झाली आहे. भगवान बुद्धाच्या व बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा प्रस्तुत नाटककाराच्या नाटकाच्या निर्मितीमागे आहे. बुर्झ्वा विचाराचाराला नाटककाराने 'डागणी' दिली, ती औचित्यपूर्ण आहे. अभिनंदन म्हणतो, ''कलयुगात विज्ञानाचा उपयोग योग्य त-हेने करून माणसाला प्रगती साधता येते, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. या देशात इंग्रजाचं राज्य होतं म्हणून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या जोडप्यानं सामान्य माणसाला ज्ञान देवू शकले. ज्ञानामुळे बहुजन समाज सज्ञान झाले. सज्ञानामुळे खोटे नाटे निराधार चमत्कार, मंत्रातंत्राचा बनावटपणा, यज्ञाचा बास्कळपणा समजू शकला. जे ईश्वरनामक, धर्मनामक शक्तीने हजारो वर्षात केले नसेल ते विज्ञानाने करून दाखविले.''[२] बुद्ध, म.फुले व डॉ.आंबेडकर यांच्या प्रेरणेतून 'डागणी' व 'नशा अशीही' ह्या नाट्यकृतीची निर्मिती झाली आहे.

विषम व्यवस्थेने माणसांमध्ये दरी निर्माण केली, भेदांच्या भिंती उभ्या केल्या व आपला स्वार्थ साधला. दैववाद, सोंग-ढोंग, अज्ञान व अस्पृश्यतेच्या विषाला नष्ट करण्याच्या प्रेरणेतून डॉ.कांबळे यांनी नाट्यलेखन केले आहे. 'नशा अशीही' च्या मनोगतात नाटककार म्हणतात, ''मादकद्रव्यापेक्षाही भयानक नशा म्हणजे पद, पैसा, प्रतिष्ठा, सत्ता, धर्म, वर्ण, जात, अभिमान आणि गर्व या नशेने पूर्णतः मानवता कीड लागून खिळखिळी होण्याच्या मार्गावर आहे. माणूस या नशेच्या धुंदीत नातं-गोतं याचा मागचा पुढचा कसलाच विचार न करता चौखूर उधळतो आहे. अशा बेधुंद नशेच्या रौंदळीत नितीमत्ता, शिष्टाचार, सत्य, न्याय जायबंद होताना दिसत आहे.''[३] वाचकांच्या मनाला, मनगटाला आणि मेंदूला मानवतावादी आकार देण्याच्या प्रबळ प्रेरणेतून डॉ.अनिल कांबळे यांनी नाटकाची निर्मिती केली आहे; अर्थात नाटककाराने जे अनुभवले, पाहिले त्याची वैशिष्ट्यपूर्ण शब्दांतून नाट्याविष्कृती केली आहे. 'डागणी' व 'नशा अशीही' या नाट्यकृती सभोवतीच्या दाहक वास्तवाला प्रतिनिधिकतेने रूपाकार देतात. रंजनाकरिता नव्हे तर अमानुषतेच्या भंजनासाठी नाटक लिहिल्याचा प्रत्यय दोन्ही नाटकांमधून येतो.

'डागणी' हे शीर्षकच वाचकाला नाटकाकडे घेवून जाणारे, आशयाला ध्वनित करणारे, औचित्यपूर्ण व व्यंग्यार्थसूचक आहे. 'डागणी' चे कथानक भावमय, अस्सल, मौलिक आहे. कसलीही गुंतागुंत, निरगाठ, नाटकीपणा, पाल्हाळ टाळून गतिमानतेने अभिनंदन व नम्रता या दोन ध्येयवेड्या तरुण-तरुणींच्या कहाणीला कलात्मकतेने गुंफले आहे. सवर्ण मुलगी व अस्पृश्य तरुण या दोघांच्या वेगवेगळ्या जातींमुळेच हे नाटक वेगळ्या उंचीवर गेले आहे. दोघेही एकाच जातीचे असते तर, प्रस्तुत नाटकातले नाट्य हरवले असते. मनुजवैरी व्यवस्थेने निर्माण केलेले जातवास्तव उद्ध्वस्त करायला जातदांडगे तयार होत नाहीत. दलितांमधील वेगवेगळ्या जातीची चिरेबंदी इमारत शाबूत ठेवण्याकडेच तथाकथित परिवर्तनवाद्यांचा कल असतो; मग त्रैवर्णिक अस्पृश्यांना मनातून स्वीकारतील कसे? डॉ.कांबळे यांची 'डागणी' अचूक होते. अस्पृश्य मुलगा व स्पृश्य मुलगी (अभिनंदन व नम्रता) एकत्र येऊन व्यवस्था परिवर्तनाची लढाई लढतात. सुरूवातीचा विरोध शेवटी मावळून जातो. परिवर्तनवादाचा विजय आणि प्रतिगामी विचाराचा पराजय, हे सूत्र नाटककाराने प्रस्तुत नाटकाच्या संहितेतून सहजतेने गुंफले आहे. अत्यंत कटू वास्तव संयमाने व कलावंतांचे भान ठेवून डॉ.अनिल कांबळे यांनी 'डागणी' मधून सरूप केले आहे. वाचकाला व प्रेक्षकाला गुंतवून ठेवणारी, वाङ्मय व प्रयोगमूल्यांच्या दृष्टीने ही नाट्यकृती मला लक्षणीय वाटते.

'डागणी' ही नाट्यकृती व्यक्तिरेखाटनाच्या दृष्टीनेही मला महत्त्वाची वाटते. 'डागणी' चे यश प्रभावी व्यक्तिदर्शनात दिसून येते. स्वाभाविक, जिवंत व्यक्तिरेखाटन हे 'डागणी'चे वैशिष्ट्य आहे. अभिनंदन, नम्रता, जंबुवंत, शशीकांत, दौलत, अम्रतराव, राघव, माधव इत्यादी व्यक्तिरेखा नाटकाचे परिशीलन करीत असताना समोर उभारतात व नाटकाचा प्रयोग पाहताना तसेच प्रयोगानंतरही मनात घर करतात. व्यक्तिच्या मनःप्रवृत्तीचे चातुर्याने रेखाटन नाटककाराने केले आहे.

'डागणी'चे लक्षण म्हणजे यातील ध्वन्यर्थपूर्ण संवाद. केवळ संवादासाठी संवाद न येता कथानकाला गतिमान करणारे व पात्रांच्या स्वभावाचे सहजतेने दर्शन घडविणारे अल्पाक्षरी संवाद आहेत; आणि हेच नाटककाराचे यश होय. बोलक्या संवादामुळे प्रेक्षक जागचा हलत नाही. शशीकांत आणि राघव यांच्यातील पृ.६२ व ६३ वरील संवाद, नम्रता व शशीकांत यांच्यातील पृ.६६ व ६७ वरील संवाद, नम्रता, अभिनंदन व दौलत यांच्यातील पृ.७२, ७३ वरील संवाद, जंबुवंत, अम्रतराव व शशीकांत यांच्यातील पृ.७७ वरील संवाद, नम्रता व अभिनंदन यांच्यातील संवाद वाचक व प्रेक्षकांना विचार करावयास भाग पाडणारे आहेत.

प्रस्तुत नाटकातील लातूर जिल्ह्यातील बोलीभाषा नाटकातील अनुभूतीला जिवंतपणे रेखाटते. उदा.माधव-''मालक तुम्ही आमची परूक्षा घेत्या वाटतय.'' (पृ.४४)

ग्यानबा - ''अरं राघू, माघा का आलातं र बाबा इतक्या रातीला?'' (पृ.११)

'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' ही शिकवण सूचकतेने नाटकातून नाटककाराने दिली आहे. आज सभोवताली जातियवादी विषारी नागफणाच काढत नाहीत, तर दंशही करीत आहेत. सवर्ण मुलींबरोबर अस्पृश्य मुलगा फिरणे, बोलणे, प्रेम करणे गतानुगतिक समाजाला अमान्य आहे. खेर्डा, खैरलांजी, कंधार अशा अनेक शहरातील व गावा-गावातील घटनांमधून वर्णवर्चस्ववादी मंडळींनी केलेलं कृत्य पुरोगामी महाराष्ट्राला लाजवणारे होते; परंतु 'डागणी' कार कांबळे यांनी आपल्या नाटकातून प्रेक्षकांच्या मनात आशावाद पेरला आहे. अस्पृश्य किंवा स्पृश्यांना मारून प्रश्न संपत नाही, तर मन परिवर्तन त्वरीत होणे शक्य नसते. डॉ.अनिल कांबळे यांनी डागणीचा जो शेवट केला आहे, तो कृत्रिम वाटण्यापेक्षा अपरिहार्य वाटतो; कारण स्वतः नाटककार कार्यकर्ता आहे. कार्यकर्ता आशावादी असतो, त्याचाच परिणाम म्हणून डॉ.कांबळे यांनी 'डागणी' चा सुखात्म शेवट केला आहे. खरे तर वर्तमान वास्तवातील अस्पृश्य व स्पृश्य मुला-मुलींतील प्रसंग प्रचंड

वेदनामय आणि समाजजीवन अस्थिर करणारे आहे. जातीच्या अहंगंडामुळे अथवा बदला घेण्याच्या प्रवृत्तींमुळे जीवालाच मारण्याचे सत्र सुरू आहे; अशावेळी 'डागणी' चा सुखांत शेवट कशासाठी? असा प्रश्न मनात निर्माण होतो.

शेवटी 'डागणी' आणि 'नशा अशीही ...!' ह्या दोन्ही नाट्यकृती वाचकाला व प्रेक्षकाला चिंतन करायला लावणा-या आहेत. वाचकाच्या मनात प्रश्न निर्माण करणारी कलाकृती ही श्रेष्ठ असते. डॉ.अनिल कांबळे यांचा हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे भविष्यातील नाटकातून कथानक, व्यक्तिरेखाटन, संवाद, घटना व प्रसंगाची निवड व अभिव्यक्ती, कृती-उक्तीचे महत्त्व अशा अनेक बाबी सखोलतेने ते शोधतील, अशी अपेक्षा आहे. डॉ.अनिल कांबळे यांनी नाटक हा अत्यंत अवघड कलाप्रकार निर्मितीचे धाडस केल्याबद्दल माझा विद्यार्थी म्हणून त्यांचे मी कौतुक करतो; आणि पुढील सकस नाट्यनिर्मितीला शुभेच्छा देतो.

उदगीर येथील उदयगिरी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनातून ज्या एकांकिका सादर केल्या जात असत त्याचे लेखक, दिग्दर्शक, नेपथ्य सर्वकाही महाविद्यालयातील मुलच करीत असतात. आंबेडकरी जाणिवेच्या अनेक तरुण कलावंतांनी आपल्या सकस अभिनयाने मुलांचे व सभोवतालच्या समाजाचे निःस्पृहतेने प्रबोधन केले. दिलीप महालिंगे, मधुकर जोंधळे, मद्देवाड बीभीषण, अंकुश सिंदगीकर, रमेश पवार, तातेराव शिंदे, लहू वाघमारे, विष्णू कांबळे, अनिल गायकवाड, जशन डोळे, अनमोल कवडेकर, अनिल खोडेवाड, गौरीशंकर पिट्टलवाड, सदाविजय पवार, अमित सोनकांबळे, बळवंत राठोड, किरण कुणकीकर, शर्मिष्ठा भोसले, तानाजी आडे (स्मरतील तशी नावं दिली आहेत) इत्यादी अभिनेत्यांनी महाविद्यालयात शिकत शिकत समाजपरिवर्तनासाठी नाटकं लिहिली व त्याचे असंख्य प्रयोग केले. आदरणीय प्राचार्य डॉ.डोळे सरांनी व त्यानंतरच्या सर्व प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांना नाट्यलेखनासाठीची प्रेरणा दिली, देत आहेत. बुद्ध, फुले, शाहू, बाबासाहेबांच्या विचारांचा जागर एकांकिकांमधून, प्रयोगाद्वारे जाज्वल्य निष्ठेने त्यांनी घातला, घालित आहेत. सामाजिक परिवर्तनाचे बाळकडू पाजण्याचे काम एक व्रत म्हणून उदयगिरीने केले, विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने केले, ह्या सर्वांच्या पाठीमागे प्रेरणा राहिली ती म.ए. सोसायटीच्या सर्व आदरणीय संस्थाचालकांची !

टीप : (विस्तारभयामुळे 'नशा अशीही...' ह्या नाट्यकृतीचे मूल्यमापन केलेले नाही. विवेचनाच्या ओघात फक्त शीर्षकाचा व मनोगताचा उल्लेख केला आहे. विविध उदाहरणे देवून 'नशा अशीही...!' ची चिकित्सा केलेली नाही. जिज्ञासूसाठी नम्र निवेदन)

संदर्भ सूची

१) अध्यक्षीय भाषण, डोळस अविनाश, पाचवे अ.भा.द.नाट्यसंमेलन, नांदेड, पृ.२
२) 'डागणी' (नाटक), कांबळे, डॉ.अनिल. पृ.५९-६०
३) तत्रैव, पृ.३